Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

२१ /२०२६

**विषय :- विद्यापीठास प्राप्त होणारी सर्व पत्रे / ई-मेल्सना पोच देणे व केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधिताना देणेबाबत...**

**संदर्भ :-** जावक क्रमांक आस्थापना/११४८ दि.३० जून, २०२३ रोजीचे परिपत्रक

शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर्स, प्रशासकीय अधिकारी व सेवक तसेच मा. वरिष्ठ अधिकारी यांचे कार्यालय यांना कळविण्यात येते की, ई-मेल्सना पोच देण्याबाबत शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २०१३ मधील कलम ८ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

**८. ई-मेल्सना पोंच देण्याबाबत.- प्राप्त होणाऱ्या ई-मेल्सना संबंधितांनी ई-मेल प्राप्त झाल्याची पोच द्यावी. तसेच प्राप्त होणारा ई-मेल त्या कार्यालयाशी किंवा विभागाशी किंवा कार्यासनाशी संबंधित नसल्यास तो संबंधित कार्यालय किंवा विभाग किंवा कार्यासनाकडे पाठवावा व तसे अर्जदारास ई-मेलने कळवावे.**

यास अनुसरुन विद्यापीठातील मा. वरिष्ठ अधिकारी यांचे कार्यालय/ सर्व अधिविभाग/अध्यासन/सेंटर/प्रशाला व सर्व प्रशासकीय विभाग यांनी विविध शासकीय कार्यालये, संस्था किंवा व्यक्तीकडून विविध कारणास्तव प्राप्त होणारे पत्र किंवा ई-मेल संदर्भात पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) विद्यापीठातील संबंधित कार्यालय/अधिविभाग/प्रशासकीय विभागानी प्रत्यक्ष पत्र घेऊन येणाऱ्यांना **पत्र प्राप्त झाल्याची पोच द्यावी.**

२) विद्यापीठातील अधिकृत ई-मेल आयडीवर प्राप्त होणाऱ्या सर्व ई-मेल्सना मा. वरिष्ठ अधिकारी यांचे कार्यालय/ सर्व अधिविभाग/अध्यासन/सेंटर/प्रशाला व सर्व प्रशासकीय विभागांनी **ई-मेल प्राप्त झाल्याची तात्काळ पोच द्यावी.**

३) प्राप्त झालेल्या ई-मेल संबंधित कार्यालय/अधिविभाग/प्रशासकीय विभागाशी संबंधित नसल्यास तो **तत्काळ योग्य त्या संबंधित कार्यालय/अधिविभाग/प्रशासकीय विभागाकडे पाठविण्यात यावा.** (Forward करावा)

४) ई-मेल इतर कार्यालय/अधिविभाग/प्रशासकीय विभागाकडे पाठविण्यात आल्यास त्याबाबतची माहिती संबंधितानां ई-मेलव्दारे त्वरित कळवावी. (**उदा.** आपला ई-मेल प्राप्त झालेला असून पुढील कार्यवाहीसाठी संबधित विभागास पाठविण्यात आलेला आहे.)

५) प्राप्त पत्रावर/ई-मेल वर संबधित अधिविभाग/प्रशासकीय विभागाने **वेळेत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीबाबत संबधितास कळविणे आवश्यक आहे.**

सदर परिपत्रकांची विद्यापीठातील सर्व अधिविभाग/प्रशासकीय विभाग व कार्यालयांनी नोंद घ्यावी व त्यानुसार अंमलबजावणी करावी.

( डॉ. व्ही. एन. शिंदे )
**कुलसचिव**

जा.क्र. आस्थापना/ ३३०
दि. 16 MAR 2026

**प्रत -**

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, चिफ रेक्टर, रेक्टर, व सेवक
२. मा.कुलगुरु,मा.प्र-कुलगुरु,मा.कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा.संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.-

**विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी/सेवक यांच्या निदर्शनास आणावे.**